



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष – १ ले. ✻ अंक २६९ वा. ✻ गुरूवार दि.०१ मे २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 1 ✻ Ishue - 269 ✻ Thursday 01 May 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610




सातारा जिल्ह्याचे नव नियुक्त अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री मल्लिकार्जुन माने यांनी आज जलमंदिर पॅलेस येथे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टीने विविध विषयांवर चर्चा झाली.

## राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन



राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी.पी.राधाकृष्णनयांनी राजभवन येथे उभय महान प्रभृतींच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात केले.यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, तसेच राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कराडमध्ये वर्षतप महोत्सव शोभायात्रा साधेपणाने

## राजस्थानी जैन श्वेतांबर मूर्तीपूजक संघाकडून दहशतवादी हल्ल्याचा निषेध

कराड : जैनांचे पहिले तीर्थकर आदीनाथ भगवान यांनी केलेल्या ४०० दिवसांच्या उपवासाच्या स्मृतिप्रीत्यर्थ येथील राजस्थानी जैन श्वेतांबर मूर्तिपूजक संघातील ६४ भाविकांनी ४००दिवसांचे उपवास केले. या उपवासांच्या पूर्तीनिमित्त येथे सलग तीन दिवस वर्षतप महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.मात्र पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्याभ्याड हल्ल्याच्या निषेधाथ् हा महोत्सव व शोभायात्रा सायेपणाने आयोजित करण्यात आली. शहरातील ६४ भाविकांच्या ४०दिवसांच्या उपवास पूर्तीनिमित सलग तीन दिवस भव्य महोत्सव साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र पहलगाम येथे पर्यटकांवर भ्याड हल्ला झाल्यानू हा महोत्सव साध्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय राजस्थानी जैन संघाच्या बैठकीत घेण्यात आला. या महोत्सवात मंगळवारी शहरातून वाद्ये व चित्ररथ टाळून साधेपणाने शोभायात्रा काढण्यात आली. चा निर्णय राजस्थानी जैन श्वेतांबर काढण्यात आली. पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यात आला. मृत पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.रविवार पेठेतील राजस्थानी जैन मंदिरपासून शोभायात्रेस



प्रारंभ झाला. मुख्य बाजारपेठेतून दत्त चौक, शाहू चौक, विश्रामगृह ते पंकज लॉनपर्यंत ही शोभायात्रा काढण्यात आली.तेथे महोत्सवातील अन्य कार्यक्रम साथेपणाने होणार आहेत. शोभायात्रेत राजस्थानी जैनबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अहिंसा परमो धर्म, जिओ और जीनेदो हा संदेश भगवान महावीरांनी संपूर्ण जगाला दिला आहे. या संदेशाचे पालन करणारा राजस्थानी जैन श्वेतांबर मूर्तिपूजक संघ पहेलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध करतअसल्याचे प.पु.प्रवलचनकार मुनिराजश्री सत्यकांत वि.म.सा. आणि प.पु.मुनिराज श्री आदित्यसोम वि.म. सा. यांनी शोभायात्रेप्रसंगी सांगितले.

# नांदगाव येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात



कराड : नांदगाव (ता. कराड) येथे बुधवारी महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी नांदगाव, मनव,ओंड येथील लिंगायत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. वि.तु.सुकरे गुरुजी यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कराड तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेंद्र माळी, रयत सहकारी साखर कारखान्याचे संचालक जगन्नाथ माळी, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत सुकरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व आरती करण्यात आली.

यावेळी चंद्रकांत कडोले, शशिकांत शेटे, रामचंद्र देगावकर, शरद शिणगारे, सदाशिव शेटे, शशिकांत माळी, मनोहर माळी, शिवाजी माळी, गणेश शेटे, ओंड ग्रामपंचायतचे माजी सदस्य विश्वनाथ माळी, राजेंद्र कुंभार, अनिल कोठावळे, मनव विकास सोसायटीचे अध्यक्ष धनाजी माळी, सतीश कडोले, शरद तांबवेकर, अनिल तांबवेकर , विजय माळी, समर्थ नगरे, मोहन कुचेकर, दीपक मुळीक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नाना खामकर, संपत उमरदंड, जगन्नाथ पाटील, बालिश थोरात, विनोद जाधव आदिंची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित सर्वांना भस्म वड्या वितरीत करण्यात आल्या. उपस्थितांचे स्वागत प्रमोद सुकरे यांनी केले.

# असमानी संघटना जयपूरचे गोपाल गुप्ता यांचा सत्कार

जयपूर : असोसिएशन स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडियाचे ३१ वे राष्ट्रीय अधिवेशन जयपुर येथे २६ व २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाची जय्यत नियोजनात्मक तयारी केल्याबद्दल राजस्थानचे अध्यक्ष गोपाल गुप्ता यांचा सत्कार राष्ट्रीय उपाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्रातील संपादकांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.या अधिवेशनासाठी देशातील विविध राज्यांतील पदाधिकारी, (पान २ वर)





# प्रा.शरद ठोकळे यांना पीएच.डी.पदवी

सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा, घटक महाविद्यालय छत्रपती शिवाजी कॉलेज येथील इतिहास विभागातील प्रा.शरद तानाजी ठोकळे यांनी नुकतीच इतिहास विषयातील पीएच.डी. पदवी संपादन केली. प्रो. डॉ. धनाजी मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय शेती या विषयावरील शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर केला होता.



प्रा.शरद ठोकळे हे छत्रपती शिवाजी कॉलेजचे माजी विद्यार्थी असून त्यांनी कमवा व शिका या योजनेतून आपले एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी इतिहास विषयातून पीएच.डी.पदवी संपादन केल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, ऑडिटर प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव मस्के, उपप्राचार्य प्रो. डॉ. अनिल वावरे, प्रो.डॉ. सुभाष वाघमारे, डॉ. रामराजे देशमुख तसेच इतिहास विभाग प्रमुख प्रो.डॉ. धनाजी मासाळ व इतिहास विभागातील सर्व सहकारी प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.



# संपादकीय....

## डागडुजीला प्राधान्य...!

पावसाळीपूर्व कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये विशेष निधीची तरतूद करण्यात येत असते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सभागृह अस्तित्वात असताना प्रशासन या कामांची यादी सादर करत असते व लोकप्रतिनिधी या कामांना मंजुरी देत असतात; परंतु कोरोना महामारीच्या साथीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्याच नसल्याने सर्वत्र प्रशासकीय राजवट असून प्रशासकाच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सध्या चालविला जात आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प देशातील काही छोट्या राज्याहून मोठा आहे.

केवळ अर्थसंकल्पच नाही, तर महापालिका कार्यक्षेत्रात येणारी लोकसंख्याही कोटींच्या घरात आहे; परंतु मुंबई महापालिकेचा भूभाग तुलनेने कमी असून त्या कमी भूभागातच ही लोकसंख्या सामावलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हार्बरमार्गे मानखुर्दपर्यंत, मध्य रेल्वेने मुलुंडपर्यंत, पश्चिम रेल्वेने चर्चगेट ते दहिसरपर्यंत तसेच कुलाबा याचा समावेश करून येणाऱ्या परिसरात मुंबई महापालिका सामावलेली आहे. मुंबई शहराची लोकसंख्या वाढत असताना व जलपुरवठा करणाऱ्या तलावांची संख्या तितकीच असताना व जलवहिन्या जुनाट असतानाही मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना कधीही करावा लागत नाही, याबाबत महापालिकेच्या कामगिरीला खरोखरीच 'सलाम'च करावा लागेल. मुंबईतील नाले व गटारे पावसाळ्याचा अपवाद वगळता कोठेही तुंबलेले पाहावयास मिळत नाही. पथदिवे बंद दिसत नाही. मुसळधार पाऊस झाल्यास अथवा सोसाट्याचा वारा सुटला, तर फांद्या पडण्याच्या अथवा वृक्ष पडण्याच्या घटना घडत असतात. अन्यथा फारशा दुर्घटना घडत नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमध्ये पावसाचे पाणी तुंबण्याचे अथवा परिसर जलमय होण्याचे प्रमाणही मंदावलेले आहे. प्रशासकीय राजवटीत मुंबई महापालिकेच्या कामाला काही प्रमाणात 'शिस्त' लागलेली आहे, असे म्हणणे देखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. जवळ आलेला पावसाळा पाहता पावसाळीपूर्व कामासाठी मुंबई महापालिका प्रशासन सतर्क झाले असून अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत. मुळातच नालेसफाई व गटाराची तळापासून स्वच्छता या दोन गोष्टी सांभाळल्यास मुंबईची तुंबई होण्याची पुनरावृत्ती होत नाही आणि अलीकडच्या काळात त्याचे प्रमाणही कमी झालेले आहे.

महापालिका आयुक्त भूषण गगरानी यांनी पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केल्याने अधिकारी व कर्मचारी त्या-त्या कामांना गती देऊ लागले आहेत. कंत्राटदारांचीही वेळेत कामे पूर्ण करून देण्यासाठी लगबग वाढली आहे. नाल्यातून काढलेला गाळ अनेकदा त्या ठिकाणी बरेच दिवस पडून असायचा, तो गाळ आणि कचरा वेळेत उचलला न गेल्यास कचरायुक्त गाळ रापण्यास सुरुवात होऊन त्या-त्या परिसरातील रहिवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असतो. हे गांभीर्य लक्षात घेऊन महापालिका आयुक्त गगरानी यांनी नालेसफाईतून काढलेला गाळ ४८ तासांमध्ये उचलण्याचे ठेकेदारांना निर्देश दिले आहे. हा कचरामिश्रीत गाळ वेळेवर उचलला गेल्यास मुंबईकरांची दुर्गंधीतून व बकालपणापासून मुक्तता होण्यास मदतच होणार आहे. मुंबईत गटारांची व नाल्यांची संख्या मोठी असल्याने गटारांची सफाई व नालेसफाई करण्याचे अग्निदिव्य महापालिका प्रशासनाला दरवर्षीच पार पाडावे लागत आहे. याशिवाय गटारे व नाले नागरी वस्तीतून, चाळींमधून वाहत असल्याने त्या ठिकाणी नालेसफाई करताना करावी लागणारे कामे हा एकप्रकारे 'द्राविडी प्राणायम' असतो, ही अतिशयोक्ती नसून वास्तविकता आहे.

रेल्वेसेवा विस्कळीत झाल्यास सर्व कारभार ठप्प होतो, असा आजवरचा अनुभव आहे. रेल्वे रुळावर गुडघाभर पाणी साचले तरी रेल्वे सेवेचा खोळंबा होण्यास फारसा वेळ लागत नाही. अन्य भागांमध्ये असणाऱ्या नाल्यांमध्ये जेसीपी उतरवून सफाई करण्यात येते. गाळ व साचलेला कचरा काढणे शक्य होते. मात्र रेल्वे हद्दीमध्ये जेसीपीच्या माध्यमातून नालेसफाई अशक्य असल्याने मानवी हातानेच येथील नालेसफाई आजही करण्यात येत आहे. त्यामुळे रेल्वे हद्दीतील नालेसफाई तळापासूनच करण्यात यावी, असे निर्देशच महापालिका प्रशासनाकडून ठेकेदाराला देण्यात येतात व शहारातील सर्व नालेसफाई ३१ मेपूर्वीच करण्याचे बंधनही संबंधित ठेकेदाराला घालून देण्यात आलेले असते. पावसाळीपूर्व कामामध्ये नालेसफाईचा भाग महत्त्वाचा असून त्याखालोखाल रस्त्यांची डागडुजीला प्राधान्य देण्यात येत असते.

# गर्जा महाराष्ट्र माझा

मराठा नावाचे अपभ्रंश रूप महाराष्ट्र आहे. सम्राट अशोकाच्या काळात आलेल्या ह्यू एन त्संग या चिनी प्रवाशाने महाराष्ट्र असा उल्लेख केला आहे. मराठी भाषिकांचे राज्य व्हावे म्हणून संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली. १०७ हुतात्म्यांचे बलिदान यासाठी झाले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही भाषावार प्रांत रचना धोरण अवलंबून केंद्र सरकारने केल्याने झाली. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या स्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी नेहमी आपणास प्रेरणा देते. एकूण ४०० किल्ले महाराष्ट्र भर आहेत. महाराष्ट्रात वनदुर्ग, जलदुर्ग, भुईकोट व गिरिदुर्ग असे किल्ले आहेत. शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याने शत्रूंना जेरीस आणले. हा झाला इतिहास.

महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे. भारतात महाराष्ट्र हे एक प्रगतीशील राज्य आहे. आजमितीस महाराष्ट्र राज्यात ३७ जिल्हे असून ३४ जिल्हा परिषदा आणि ३५८ तालुके आहेत. सध्यातरी मुंबई, नागपूर, पुणे ही आंतरराष्ट्रीय विमानतळे महाराष्ट्र राज्यात कार्यरत आहेत. नाशिक, नांदेड, औरंगाबाद (संभाजीनगर), जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, शिर्डी ही विमानतळे देशांतर्गत वाहतूक करतात. राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर सह्याद्री पर्वत पसरला आहे.सह्याद्री पर्वताची लांबी सुमारे १,६०० किलो मीटर आहे. या पैकी महाराष्ट्रा मध्ये ७२० किलो मीटर लांबीचा सह्याद्री पर्वत आहे. याला 'पश्चिम घाट या नावाने ही ओळखले जाते. याची सरासरी उंची ९१५ ते १,२२० मी. आहे. महाराष्ट्रामध्ये सह्याद्रीची उंची उत्तरेकडे वाढत जाते, तर दक्षिणेकडे कमी होत जाते. महाराष्ट्र समृद्ध करणाऱ्या भीमा, गोदावरी, पवना, पंचगंगा, पाताळगंगा, इंदायणी, कोयना, कुंडलिका, तापी, गिरणा, वैनगंगा, नीरा, वर्धा, कृष्णा, पूर्णा, चंदभागा, वेण्णा, रंगावली, भातसा या कांही महत्वाच्या नद्या आहेत. महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली आहे.समर्थ रामदास स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोपानदेव, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत निवृत्तीनाथ, संत मीराबाई, संत मुक्ताई, संत सावता माळी, संत सोयराबाई, यासारख्या संतांची महाराष्ट्र ही जन्मभूमी, कर्मभूमी राहिली आहे. देहू, आळंदी, कोल्हापूर, तुळजापूर, माहुर, नासिक, त्र्यंबकेश्वर, अशी अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. महाराष्ट्र राज्यात जागतिक वारसा ठरलेली तीन लेणी आहेत कैलास, वेरूळ, घारापुरी. याशिवाय, कार्ले, भाजे, नाडसूर, गांधार पाले, लेण्याद्री, ठाणाळे, कुडा, आगाशिव अश्या लहानमोठ्या लेण्या आहेत.


महाराष्ट्रात मँगॅनीज, लोह,चुनखडी ,बॉक्साइट, डोलोमाईट, क्रोमाइट, कायनाईट व सिलिमनाईट अशी विविध खनिजे आहेत. महाराष्ट्र राज्यात ६० भाषा बोलल्या जातात तर ४० बोलीभाषा, आदिवासी भाषा बोलल्या जातात. गोंड, भिल्ल, वारली, पावरी, मावची, कोरकू, कोलामी, कातकरी, माडिया आदी बोलीभाषा प्रमुख आहेत. गोंडी व भिल्ली या पोटभाषा अतिप्राचीन आहेत. गोंडी पोटभाषा महाराष्ट्रात प्राधान्याने बोलली जाते.

महाराष्ट्रात गोड चवी सामान्यतः तांदूळ आणि गुळापासून तयार केल्या जातात. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, भाजीपाला, मसूर, हंगामी फळे आणि भाजीपाला या राज्यातील मुख्य अन्नधान्यांचा समावेश आहे. तसेच, शेंगदाणे कोकम, आमसूल, चिंच, कच्चा आंबा आणि नारळ हे काही खास पदार्थ आहेत जे पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. पिठले भाकरी, सोल कढी, कोथिंबीर वडी, आलुवडी, मिक्स व्हेज कोल्हापुरी, साबुदाणा वडा आणि खिचडी, पोहे, बटाटा भाजी, आमटी, तांबडा रस्सा, पंधरा रस्सा, भरली वांगी हे महाराष्ट्रीयन घरातील काही पारंपारिक पदार्थ आहेत.तर मोदक, पुरण पोळी, श्रीखंड, आम्रखंड हे काही प्रसिद्ध गोड पदार्थ आहेत.कवी यशवंत हे महाराष्ट्राचे राजकवी आहेत. पिवळ्या पायाचे हिरवे कबूतर-हरियाल किंवा हराली राज्य पक्षी आहे. महाराष्ट्राचा राज्य मासा सिल्व्हर पापलेट आहे. भीमाशंकर जंगलात आढळणारा शेकरू हा राज्य प्राणी आहे. प्रत्येक मराठी माणसाने अभिमान बाळगावा असा आपला महाराष्ट्र आहे. गर्जा महाराष्ट्र माझा हे महाराष्ट्र राज्याचे गीत झाले आहे.

– **बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर,** निगडी – पुणे.

# कराडला मनोविकार तज्ञांची राज्यस्तरीय परिषद

## तीन व चार मे रोजी आयोजन, डॉ.नंदकुमार मुलमुलेंचे उद्या व्याख्यान



कराड : महाराष्ट्र, गोवा, गुजरात या तीन राज्यातील मनोविकार तज्ञ डॉक्टरांची परिषद कराड सायकॅट्रीक असोशिएशनच्यावतीने तीन आणि चार मे रोजी कराड येथील हॉटेल सत्यजित विट्स येथे आयोजित करण्यात आली आहे. त्यात तीन राज्यातील २५० मनोविकार तज्ञ डॉक्टर उपस्थित राहतील. मनोविकार तज्ञ डॉक्टरांच्या परिषदेच्या पुर्वसंध्येला दोन मे रोजी सर्वांसाठी नांदेड येथील प्रसिध्द व्याख्याते डॉ. नंदकुमार मुलमुले यांचे सुखाचा शोध या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. येईल अर्बन बँकेच्या शताब्दी सभागृहात दोन मे रोजी सायंकाळी पाच वाजता हे व्याख्यान होईल, अशी माहिती डॉ. शरद क्षीरसागर, डॉ. दिनेश टेंबे, डॉ. अजिश मंगोट यांनी दिली. कराड सायकॅट्रीक असोशिएशनच्यावतीने यापुर्वी सातारा, सांगली, सोलापूर, हेळगाव, धारवाड या पाच जिल्ह्यातील मनोविकार तज्ञांची परिषद घेण्यात आली होती. यंदाच्या परिषेदमध्ये सर्व तज्ञ मंडळी मॅनेजिंग, मेडीकल, को मोरबॅलिटी इन सायकॅट्रीक प्रॅक्टीस या विषयावर वेगवेगळ्या सत्रात मार्गदर्शन करतील. नवीन डॉक्टरांसाठी व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्रांची सोय करण्यात आली आहे. या परिषदेच्या आयोजनासाठी डॉ. क्षीरसागर, डॉ. टेंबे, डॉ. मंगोट परिश्रम घेत आहेत. त्यांना डॉ. अजय देशमुख, डॉ. उल्हास कुंभार, डॉ. मेघना मुर्ती, डॉ. सत्यजीत पाटील, डॉ सिध्दार्थ यांचे सहकार्य लाभत आहे. या परिषदेमध्ये दिली जाणारी स्मृतीचिन्हे व पुषगुच्छ ही संजीवनी संस्थेतील दिव्यांग मुलांनी तयार केलेली दिली जाणार आहेत.

# देशात जातनिहाय जनगणना होणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट तसेच राजकीय प्रकरणांशी संबंधित कॅबिनेट समितीची बैठक बुधवारी झाली. यावेळी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक दिवसांपासून देशात जनगणना घेण्यासोबतच जातनिहाय जनगणना घेण्याची मागणी होत होती.

## अस्मानी संघटना जयपूरचे गोपाल गुप्ता...

(पान १ वरून) सदस्य उपस्थित होते. या सर्वांची निवासी व्यवस्था, भोजन व्यवस्था व कार्यक्रम स्थळी येण्या - जाण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. कोणत्याही राज्यातील पदाधिकारी, सदस्याची गैरसोय होणार नाही. याची दक्षता राजस्थानचे अध्यक्ष गोपाल गुप्ता यांच्यासह त्यांच्या सहकार्याने घेतली होती. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय सचिव शंकर कतीरा(गुजरात), गोरख तावरे(कराड), मुकुंद जोशी (गडचिरोली), नेताजी मेश्राम (चंद्रपूर), शोभा जयपुरकर (नागपूर), धर्मेंद्र सोनी(कोटा) उपस्थित होते.

# कृष्णा कारखान्याच्या ऊस तोडणी वाहतूक करारास प्रारंभ



शिवनगर : य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामाकरिता ऊसतोडणी वाहतूक करारांचा प्रारंभ उत्साहात करण्यात आला. कारखान्याचे संचालक वसंतराव शिंदे यांच्या शुभहस्ते व व्हाईस चेअरमन जगदीश जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत तोडणी वाहतूकदारांना करारपत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी संचालक संजय पाटील, जे डी मोरे, अविनाश खरात, विलास भंडारे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, बहेचे माजी उपसरपंच मनोज पाटील, वैभव जाखले यांची प्रमुख उपस्थिती होती. व्हाईस चेअरमन जगदीश जगताप म्हणाले, कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेशबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व ऊसतोडणी वाहतूकदार, कंत्राटदार यांच्या सहकार्यामुळे कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी पार पडला. येणारा गळीत हंगामही आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पाडायचा आहे. मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांनी ऊसतोडणी वाहतूकदार, कंत्राटदार यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, इथून पुढे गळीत हंगामांचा कालावधी लहान असणार आहेत. त्यामुळे नियोजनबद्ध तोडणी यंत्रणा राबवून आपण गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडुया. यावेळी जनरल मॅनेजर केन दादासाहेब शेळके, ऊसविकास अधिकारी पंकज पाटील, एच. आर. मॅनेजर संदीप भोसले, सहाय्यक शेती अधिकारी अजय दुपटे, सहाय्यक ऊसविकास अधिकारी शिवाजी बाबर, केनयार्ड सुपरवायझर विजय मोहिते आदींसह ऊसतोडणी वाहतूकदार व कंत्राटदार, गट अधिकारी व शेतकी कर्मचारी उपस्थित होते.

# रवी गीते यांचा सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ



नवी मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाचे माहिती उपसंचालक रवी गीते हे नियतवयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या चार दशकांच्या पत्रकारिता आणि शासकीय सेवेतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी कोकण भवन, नवी मुंबई येथे एका छोटेखानी कार्यक्रमात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, रायगडच्या जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, सहायक संचालक संजिवनी जाधव-पाटील, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे, तसेच कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि पत्रकार मित्र उपस्थित होते.

शेवटी रवी गीते यांनी आपल्या भावनिक भाषणात सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आणि आपल्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत अनुभव सांगितले की, पत्रकारिता आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांत मला समाजाशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळाली. माहिती व जनसंपर्क विभागाने मला भरभरून दिले. या विभागात मला उत्तम मित्र भेटले तीच माझी खरी संपत्ती आहे.

# भारताला जागतिक सर्जनशीलतेचे केंद्र बनवणारा WAVES 2025 महोत्सव

नवी दिल्ली : १९ जानेवारी २०१९ रोजी मुंबईतील नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमाच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक प्रेरणादायी स्वप्न मांडले ते म्हणजे आपण एका परिषदेपासून सुरुवात करू आणि तिला डाव्होसच्या धर्तीवर जागतिक परिषद बनवू. या दृष्टिकोनाला साकार करणारा एक भव्य उपक्रम म्हणजे वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (WAVES) २०२५.

भारताची सांस्कृतिक आणि मनोरंजनाची राजधानी, मुंबई, १ ते ४ मे २०२५ दरम्यान या अभूतपूर्व जागतिक सोहळ्याचे यजमानपद भूषवणार आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने इंटरनेट अँड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया (WAVES) आणि फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI) यांच्या सहकार्याने हा सोहळा मुंबईत आयोजित केला आहे. WAVES २०२५ हे भारताला जागतिक कंटेंट हब म्हणून स्थापित करण्याचे एक क्रांतिकारी पाऊल आहे, जिथे सर्जनशीलता, नवप्रवर्तन आणि भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा एकत्र येणार आहे. जगात प्रथमच भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रीज या ब्रिदवाक्यासह, WAVES २०२५ ही भारतातील पहिली जागतिक




मीडिया आणि मनोरंजन परिषद आहे, जी मुंबईच्या बांद्रा कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजनासाठी सज्ज झाले आहे. हा चार दिवसांचा महोत्सव भारताच्या ५४ अब्ज अमेरिकी डॉलरच्या (२०२६ पर्यंत) मीडिया आणि मनोरंजन बाजारपेठेला नव्या उंचीवर नेण्यासाठी आकारला गेला आहे. या परिषदेत भारताच्या कथाकथन परंपरेला कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ॲनिमेशन, VFX, गेमिंग, IR/VR/XR, कॉमिक्स, चित्रपट, माहितीपट, सोशल मीडिया, OTT प्लॅटफॉर्म आणि प्रसारण यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांशी जोडले जातील. ही परिषद केवळ एक इव्हेंट नाही, तर सर्जनशीलतेचा महासागर आणि नवप्रवर्तनाची लाट आहे, जी भारताला जागतिक सर्जनशील केंद्र बनवण्यासाठी सज्ज झाले आहे.

WAVES २०२५ मध्ये १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, ४० जागतिक मंत्री आणि नेटफ्लिक्स, गुगल, ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ, सोनी पिक्चर्स, ॲडोब, एपिक गेम्स यासारख्या दिग्गज कंपन्या सहभागी होतील. जागतिक बॉलिवूडचे वरिष्ठ कलाकार शाहरुख खान, रजनीकांत, अक्षय कुमार, चिरंजीवी, आमिर खान, दीपिका पादुकोण, रणबीर कपूर आणि दिलजीत दोसांज यांच्या सल्लागार मंडळाने या परिषदेला पाठिंबा दिला आहे. नेटफ्लिक्सचे टेड सरांडोस, ॲमेझॉनचे माइक हॉपकिन्स आणि अमिताभ बच्चन यांसारख्या दिग्गजांची उपस्थिती WAVES परिषदेला जागतिक स्तरावर ओळख देईल. या परिषदेचा मुख्य उद्देश भारताच्या मीडिया आणि मनोरंजन उद्योगाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देणे, आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देणे आणि नवप्रवर्तनाला गती देणे आहे. भारत आणि इतर देशांमधील सर्जनशील उद्योगांमधील भागीदारी वाढवणे, AI आणि गेमिंगसारख्या तंत्रज्ञानांचा वापर करून उद्योगाला नवे आयाम देणे आणि २०२७ पर्यंत ३६.१ अब्ज डॉलरची सर्जनशील अर्थव्यवस्था उभारणे हा या परिषदेचा केंद्रबिंदू आहे. यामुळे २-३ लाख रोजगार निर्माणही होतील, सोबतच महिला-नेतृत्वातील स्टार्टअप्स आणि १२-१९ वयोगटातील क्रिएटर्सना प्राधान्य देऊन त्यांचा समावेशकता वाढेल.

**१ मेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन**

WAVES २०२५ या बहुप्रतीक्षित महोत्सवाचा प्रारंभ परिषदेच्या पहिल्या दिवशी १ मे २०२५ रोजी भव्य उद्घाटन समारंभाने होणार असून, या सोहळ्याचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल. यावेळी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह विविध जागतिक नेते उपस्थित राहणार आहेत. ग्लोबल मीडिया डायलॉग्समध्ये मंत्र्यांसह धोरणे, गुंतवणूक आणि सहकार्यासाठी चर्चा होतील . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत PM-CEO राउंडटेबल आयोजित होतील, ज्यामध्ये उद्योगांच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण संवाद होतील. भारत पॅव्हिलियनच्या लाँचद्वारे नाट्यशास्त्रापासून AI चालित कथांपर्यंतचा भारताचा कथाकथन वारसा प्रदर्शित होईल. एक्झिबिशन आणि गेमिंग अरेनामध्ये AI, AR/VR/XR, VFX मधील नवकल्पना दिसतील. WAVES बाजार क्रिएटर्स, स्टुडिओ आणि खरेदीदारांसाठी नेटवर्किंगची संधी या आतंरराष्ट्रीय व्यासपीठावर एक छताखाली उपलब्ध होतील, तर शास्त्रीय आणि फ्यूजन कॉन्सर्ट्सह सांस्कृतिक कार्यक्रम या दिवसाला अविस्मरणीय बनवतील.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# टिळक सेवक विश्वास जाधव यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार



कराड : टिळक हायस्कूल,कराड मधील सेवक विश्वास आप्पा जाधव नियत वयोमानानुसार ३१ मे २०२५ रोजी २८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहे.त्यानिमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.प्रसंगी अनेक सहकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढले.

टिळक हायस्कूलचे मुख्याध्यापक धनाजी देसाई यांनी सत्कार मूर्ती विश्वासात जाधव यांच्या सचोटी, प्रामाणिकपणा, शांतवृत्ती,जबाबदारीची जाणीव, मनमिळावू स्वभाव,सर्वांना सहकार्य सहकार्य करण्याची वृत्ती इत्यादी गुणांची प्रशंसा केली.शाळा माऊलीच्या ऋणात सदैव राहू,शाळा हे माझे विस्तारित कुटुंब आहे त्यासाठी भविष्यात सुद्धा सक्रिय राहू असे वचन सत्कारास उत्तर देताना विश्वास अप्पा जाधव यांनी काढले. शिक्षण मंडळ,कराड सेवकांच्या पतसंस्थेतर्फे त्यांना भाग भांडवलाचा धनादेश प्रदान करण्यात आला. प्रसंगी शाळेचे उपमुख्याध्यापक किसन वाघमारे,पर्यवेक्षक शरद शिंदे, कार्याध्यक्ष संग्राम माळी,उपकार्याध्यक्षा संध्या ठाकर,सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विश्वास आप्पा जाधव यांचे कुटुंबीय,नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होता.

# मागेल त्याला सौर कृषी पंप-बनावट कॉलला बळी पडू नका;महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

मुंबई – मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून महावितरणतर्फे सर्वात आधी नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य या क्रमाने सौर कृषी पंप बसविण्यात येत आहेत. प्रतीक्षा यादी बदलून पंप आधी बसवून देतो, असे आश्वासन देणारे काही बनावट कॉल शेतकऱ्यांना येत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. शेतकऱ्यांनी अशा बनावट कॉल किंवा मेसेजला बळी पडू नये तसेच अशा कॉलनुसार कोणालाही पैसे देऊ नयेत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन व पारदर्शक आहे. शेतकऱ्यांनी ज्या क्रमाने नोंदणी केली आहे त्यानुसार पंप बसविण्यात येत आहेत. कोणालाही प्रतीक्षा यादी बदलून व इतरांना डावलून पंप देण्यात येत नाहीत. शेतकऱ्यांनी नोंदणी करताना आपल्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर पंप बसविण्यासाठी नंतर कधीही पैसे भरण्याची गरज नाही.

शेतकऱ्याने आपल्या हिश्श्याची रक्कम भरून पंप बसविणाऱ्या एजन्सीची निवड केली की त्या शेतकऱ्याचे नाव प्रतीक्षा यादीत समाविष्ट होते. यादीनुसारच पंप बसविण्यात येत आहेत. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत प्रतीक्षा यादी डावलून आधी पंप बसवून देतो असे बनावट कॉल आले, तर शेतकऱ्यांनी त्याबाबत महावितरणच्या १८०० २३३ ३४३५ अथवा १८०० २१२ ३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. तसेच जवळच्या महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून शंका निरसन करता येईल.

या योजनेत शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स व सौर कृषी पंप असा संपूर्ण संच




मिळतो. केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. अनुसूचित जाती – जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ पंपाचे बिल येत नाही. तसेच दिवसा वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या सोईचे होते. राज्य सरकारने जाहीर केलेली ही योजना शेतकऱ्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली असून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात नोंदणी केली आहे. सौर कृषी पंप बसविण्याच्या बाबतीत सध्या महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार लवकरात लवकर पंप बसविण्यासाठी महावितरण प्रयत्न करत आहे.

**साहित्याची मागणी चुकीची**

शेतात सौर कृषी पंप बसविताना काही ठिकाणी संबंधित एजन्सीकडून शेतकऱ्यांकडे वाहतूक खर्च अथवा अन्य साहित्याची मागणी झाल्याच्याही तक्रारी महावितरणकडे आल्या आहेत. परंतु सौर कृषी पंप बसविण्याबाबत संपूर्ण कामाची जबाबदारी संबंधित एजन्सीची असल्याने शेतकऱ्यांनी अशा प्रकारे साहित्याची मागणी झाल्यास त्याची दखल घेऊ नये व महावितरणकडे तक्रार करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**– मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई**

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात १२ मे रोजी वन्यप्राणी प्रगणना

शिराळा : सह्याद्री व्याघ्र राखीवमध्ये वन्यजीव निरीक्षणाचा अद्वितीय अनुभव देणाऱ्या निसर्गानुभव कार्यक्रम २०२५ चे आयोजन १२ मे २०२५ रोजी करण्यात येत आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊन वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक वाक्राचा अनुभव घेण्याची संधी सर्व इच्छुकांसाठी उपलब्ध आहे.यावेळी जंगलातील पाणवठ्यावर बांधलेल्या मचाणावर बसून प्राणीगणना करण्याची सुवर्णसंधी सहभागी होणाऱ्यांना मिळणार आहे.

या मधे नाव नोंदणीसाठी: ऑनलाईन फॉर्म लिंक: https://forms. गुगल gle/Hjq8VeSMqYmct9e अशी असूनऑनलाईन नोंदणी २७एप्रिलपासून सुरू झाली असून नोंदणी करण्याचीअंतिम मुदत ४ मे २०२५, रात्री १२ वाजेपर्यंत आहे. इच्छुकाने स्वतंत्रपणे गुगल फॉर्मद्वारे अर्ज करणे बंधनकारक आहे. गट अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्जासोबत २०० रुपये नोंदणी शुल्क (ऑनलाईन पेमेंट) अनिवार्य आहे. शुल्क न भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

निवड प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर आधारित असेल. निवडीनंतर सहभाग शुल्क २ हजार प्रति व्यक्ती (ऑनलाईन पेमेंट) आकारले जाईल, ज्यामध्ये भोजन, न्याहारी व आकर्षक भेटवस्तू समाविष्ट आहेत. सहभागींचे वय १८ ते ७० वर्षे असावे, अल्पवयीन व्यक्तींना पालक, कायदेशीर संरक्षकासोबतच सहभागी होता येईल. सहभागींनी सह्याद्री व्याघ्र राखीवच्या नियम व अटींचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. कार्यक्रम कालावधी : १२ मे दुपारी १२ वाजता, समारोप : १३ मे सकाळी १० वाजता होणार आहे. सहभागीनी जंगलातील मचाणांवर बसून पाणवठ्यावरील वन्यप्राण्यांची प्रगणना करायची आहे. हे अनुभव वन्यजीवन आणि नैसर्गिक परिसंस्थेचे महत्त्व समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.मचाणांची संख्या मर्यादित असल्याने अंतिम निवड व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार केली जाईल. असे चांदोली अभयारण्याचे वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी नंदकुमार नलवडे यांनी सांगितले.

# आई वडीलांच्या उपस्थितीत बच्चे सरांची सेवा पुर्तता होणे म्हणजे भाग्यवान



शिराळा :चांगल्या कर्माच फळ नेहमीच चांगले मिळते गोंविद बच्चे सरांनी देखील शिक्षक म्हणून काम करत असताना आदर्श शिक्षक सुसंस्कृतपणा निस्वार्थी व्यक्तीमत्व मनमिळाऊ स्वभाव प्रामाणिकपणे शिक्षण क्षेत्रातसेवा केली आहे त्यामुळेच बच्चे सरांच्या सेवा पूर्ती कार्यक्रमास त्यांचे आई वडील उपस्थितीत आहेत हे भाग्यवान आहेत असे मत केंद्र सम्नवयक सुनिल अस्वले यांनी व्यक्त केले.

म्हाळुंगे ठाणे विद्यामंदिर जिल्हा परीषद शाळेतील मुख्याध्यापक गोंविद बच्चे हे पस्तीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले यानिमित्त दळवेवाडी केंद्रातील सर्व शिक्षकांनी शुभेच्छा देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी सन्मानपूर्वक सन्मानपत्र शाल बुके देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते यावेळी केंद्र ,प्रमुख कैलास वसावे सर सर्व शिक्षक शिक्षिका प्रमुख उपस्थित होते

यावेळी अनेक शिक्षक शिक्षिकांनी आपली मनोगतात बच्चे सरांनी केलेल्या शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानच कार्य उल्लेखनीय असे केले आहे.मुंबई, रत्नागिरी, पन्हाळा तालुक्यातील सेवा करत असताना विद्यार्थी प्रिय पालक प्रिय आदर्शवत शिक्षण क्षेत्रात काम केले आहे. गोंविद बच्चे सरांनी शिक्षण क्षेत्रात चांगले कार्य करताना आनंदाने उत्साहात केल्याचे समाधान आहे नोकरीतून सेवानिवृत्त झालो तरी शिक्षण क्षेत्रात अजुनही कार्यरत रहाणार असल्याचे सांगितले यावेळी सावर्डे येथील आई पार्वती बच्चे वडील रामचंद्र बच्चे भाऊ रघुनाथ बच्चे मुले रोहित बच्चे विश्वजित बच्चे केकले मांगले गावातील नातेवाईक उपस्थित होते.

# राजारामबापू बँकेच्या अध्यक्ष विजयराव यादव, उपाध्यक्ष माणिकराव पाटील यांची बिनविरोध निवड



इस्लामपूर : माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली देशातील अग्रगण्य बँक म्हणून वाटचाल करीत असणाऱ्या पेठ (ता.वाळवा) येथील राजारामबापू सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी विजयराव विठ्ठलराव यादव (बावची) यांची,तर उपाध्यक्षपदी माणिकराव शामराव पाटील (बोरगाव) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपनिबंधक संभाजी पाटील हे निवडणूक निर्णय अधिकारी होते. नूतन अध्यक्ष- उपाध्यक्षांचा सत्कार केला. मावळते अध्यक्ष प्रा.शामराव पाटील यांचा विजयराव पाटील यांनी सत्कार केला.

माजी मंत्री आ.जयंतराव पाटील,राजारामबापू सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांनी नूतन अध्यक्ष- उपाध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. कारखाना कार्यस्थळावर लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बैठकीत डॉ.प्रकाश पाटील यांनी अध्यक्ष पदासाठी विजयराव यादव यांचे नांव सुचविले, धनाजी पाटील यांनी अनुमोदन दिले. तर सुभाषराव सुर्यवंशी यांनी उपाध्यक्ष पदासाठी माणिक पाटील यांचे नांव सुचविले, आनंदराव लकेसर यांनी अनुमोदन दिले.

जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब पाटील, तालुकाध्यक्ष विजयराव पाटील,जिल्हाध्यक्ष देवराज पाटील,प्राचार्य आर.डी.सावंत,नेर्ले सरपंच संजय पाटील, महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव,प्रदेश सदस्या कमल पाटील उपस्थित होते. विजयराव यादव व माणिकराव पाटील यांनी माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी बँकेचे अध्यक्ष- उपाध्यक्ष म्हणून संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. व्यवस्थापकीय संचालक प्रदीप बाबर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सरपंच संजय पाटील यांनी आभार मानले.

# इस्लामपूर बार असोसिएशनच्या निवडणुकीत लोकशाही विधिसेवा आघाडीचे दणदणीत विजय

इस्लामपूर : इस्लामपूर बार असोसिएशनच्या निवडणुकीत लोकशाही विधिसेवा आघाडीने दणदणीत यश मिळवत सर्व प्रमुख पदांवर विजय संपादन केला. ३४० मतदारांपैकी तब्बल ३२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणुकीत वकिल बांधवांनी अनुभव, पारदर्शकता, कार्यक्षमतेच्या मूल्यांना मत देत लोकशाही विधिसेवा आघाडीवर विश्वास दाखवला. अध्यक्षपदी ड. चंद्रशेखर पाटील यांनी २४७ मते मिळवून विजय मिळवला. उपाध्यक्षपदी ॲड. वैभव विश्वनाथ बोंगाळे यांना १५५ मते मिळाली. सचिवपदी ॲड. नंदकिशोर महाडिक यांनी १७२ मते तर सहसचिवपदी ॲड. अभिनय कांबळे यांनी २३० मते मिाली.




१० वर्षांवरील गटातून ॲड.अमोल पाटील यांनी २३७, ॲड. सचिन बी. निकम यांनी २३४, आणि ॲड. एकनाथ बाळकृष्ण आलूगडे यांनी १८५ मते मिळवून यश संपादन केले. १० वर्षांखालील गटातून ॲड. विद्या विश्वास पाटील यांना २०३, ॲड. अनिकेत अनिल घेवदे यांना २३४, आणि ॲड. विनायक रघुनाथ आटूगडे यांना १७१ मते प्राप्त झाली.

या निवडणुकीत विरोधी परिवर्तन विकास पॅनल कडून जोरदार लढत झाली. या पॅनलचे नेतृत्व ॲड.एस.आर.पाटील (ढवळी) आणि ॲड.बी.आर.गायकवाड यांनी केले. अध्यक्षपदासाठी ॲड.एम.व्ही.कुलकर्णी यांना ७८ मते मिळाली. उपाध्यक्षपदासाठी ॲड.कौस्तुभ मिरजकर यांनी ११९ मते मिळवली, तर अपक्ष उमेदवार ॲड.शरद हळदे पाटील यांना ५० मते मिळाली. सचिवपदासाठी ॲड.अविनाश पाटील यांना १५० मते, तर सहसचिवपदासाठी ॲड. दीपक पाटील यांना ९५ मते प्राप्त झाली.

दहा वर्षांवरील गटातून ॲड.वैभव गायकवाड यांना ११८, आणि ॲड. इरफान मुल्ला यांना १३० मते मिळाली. दहा वर्षांखालील गटातून ॲड.अर्जुन पाटील यांना ९१, ॲड.तृप्ती सूर्यगंध यांना १४१, आणि ॲड. सचिन जाधव यांना १०१ मते मिळाली. या मतांवरून परिवर्तन पॅनलने काही ठिकाणी चांगली लढत दिली असली तरी एकूण निकाल लोकशाही विधिसेवा आघाडीच्या बाजूने गेले. निवडणुकीत लोकशाही विधिसेवा आघाडीचे पॅनलप्रमुख ॲड.आर.ए.मोहिते प्रचारात ॲड.जगदीश थोरात, ॲड.विजय खरात, ॲड.ए.बी.पाटील, ॲड.फिरोज मगदूम, ॲड.सुनील पाटील, ॲड.सुरेश पाटील, ॲड.दिग्विजय ईश्वरा पाटील, ॲड.किरण एस पाटील, ॲड.विक्रमसिंह भोसले, ॲड.उमेश कोळेकर, ॲड.ए.डी.माळी, ॲड.सुनील पाटील, ॲड.एस.बी.जाधव, ॲड.महेश पाटील व ॲड.रणजीत पाटील यांचे मोलाचे योगदान लाभले.

# डॉ.अरुणाताई बर्गे यांच्यामुळे गरीबाची वाचली दृष्टी ज्योत

कोरेगाव(अजित जगताप): सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून कार्यरत राहिले पाहिजे असा संदेश देणाऱ्या कोरेगाव येथील डॉ अरुणाताई बर्गे यांच्या प्रयत्नामुळे सामाजिक कार्यकर्ते रमेश उबाळे यांच्या सहकार्याने एका गरीब महिलेची दृष्टी ज्योत पुन्हा तेवत ठेवण्यात यश मिळाले. यामुळे अनेकांनी डॉ. अरुणाताई बर्गे यांना धन्यवाद दिले आहेत.

शिरढोण येथील बौद्ध वस्तीतील गरीब महिला सौ. सविता खंडाईत नेहमीप्रमाणे उपजीविकेसाठी शेतात मजुरीसाठी गेल्या होत्या. भांगलन काम करत असतानाच अचानक त्यांच्या एका डोळ्यावर दगडी खडा उडला. त्यामुळे त्यांच्या डोळ्याला जखम झाली. डोळा जाण्याची भीती वाटल्यामुळे अनेक ठिकाणी उपचार केले.




त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते रमेश उबाळे यांना भेटा. असा अनुभवी व्यक्तीने सल्ला दिला. त्यानुसार सौ खंडाईत यांनी श्री उबाळे यांची भेट घेऊन त्यांना आपली व्यथा व गरिबीची जाणीव करून दिली.

अखेर श्री रमेश उबाळे यांच्या सहकार्याने कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे यांच्या बहीण डॉ. अरुणाताई बर्गे यांच्या दवाखान्यात घेऊन गेले. सर्व तपासणी अहवाल आणि रुग्णाच्या गरिबीची जाणीव ठेवून मोफत औषध करण्याचा निर्णय घेतला .त्यामध्ये त्यांना यश आले. एका गरीबाचे डोळे वाचल्यामुळे श्री रमेश उबाळे यांच्याही डोळ्यातून आनंद अश्रू वाहिले. डॉक्टर बर्गे ताईंनी केलेल्या कार्यामुळे त्यांनाही माणुसकी जपण्यास बळ मिळाले. डॉ. अरुणाताई बर्गे यांच्या या माणुसकीच्या कामगिरीबद्दल त्यांना संविधान उद्देशिका देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी पुण्याचे आयजी कार्यालयाच्या स्वीय सहाय्यक सौ. तृप्ती रमेश उबाळे, ऋग्वेद उबाळे व रमेश उबाळे उपस्थित होते.

# सहकार भारतीच्या सांगली महानगर अध्यक्षपदी शशिकांत राजोबा

## महामंत्री शैलेश पवार, संघटन प्रमुख संदिप कुलकर्णी

शिराळा : सहकार भारती सांगली महानगर यांच्या नूतन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. सांगलीतील स्व.म.ह तथा अण्णा गोडबोले सभागृह येथे कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सहकार भारतीचे प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, सहकार भारतीचे प्रदेश कोषाध्यक्ष श्री.गणेश गाडगीळ, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप, ग्रामीण अध्यक्ष सुमंत महाजन, महानगर अध्यक्ष शशीकांत राजोबा, तासगाव अर्बनचे अध्यक्ष महेश्वर हिंगमिरे, सुभाषचंद्र मालाणी उपस्थित होते.

प्रास्ताविक शशीकांत राजोबा यांनी केले. गणेशराव गाडगीळ, संजय परमणे, शरद जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप यांनी नूतन कार्यकारिणी जाहीर केली. कार्यकारिणी अशी : उपाध्यक्ष किशोर शहा, अनिल मगदूम, श्रीकांत मगदूम, सचिव अमोल बोळाज, सहसंघटन प्रमुख-सुषमा कुलकर्णी, महिला प्रमुख उत्कर्षा लाडे, महिला सहप्रमुख-स्वाती सावळवाडे, कोषाध्यक्ष बाळासाहेब खुडे, बँक प्रकोष्ठ प्रमुख सागर घोंगडे, सहप्रमुख सागर बिरनाळे, अनिल बिरजे, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख एन.जे.पाटील, सहप्रमुख-धीरज नसलापुरे, पगारदार पतसंस्था प्रमुख सतीश सावंत, सहप्रमुख धनाजी हेगडे,ग्राहक संस्था प्रकोष्ठ प्रमुख श्रुती जोशी, सहप्रमुख पृथ्वी कांबळे, गृहनिर्माण प्रकोष्ठ मंदार देशपांडे, सहप्रमुख श्रीशैल्य कोठावळे, बचतगट प्रकोष्ठ संपदा आरवाडे, सहप्रमुख गीतांजली टेके, विकास सोसा प्रकोष्ठ सुरेश गायकवाड, सहप्रमुख शशिकांत चौगुले, मत्स्य प्रकोष्ठ प्रमुख अतुल बावधनकर, साखर कारखाना प्रकोष्ठ मधुकर पाटील, सनदी लेखापाल प्रकोष्ठ प्रमुख सी.ए सलील लिमये, विधी प्रकोष्ठ प्रमुख सुनेत्रा रजपूत, आय.टी प्रकोष्ठ प्रमुख मधुकर डुबल, प्रसिद्धी प्रमुख अवधूत ठोके, ऑडिटर प्रकोष्ठ प्रमुख सुरेश कोरे, मल्टीस्टेट प्रकोष्ठ परशराम कदम, सदस्य अण्णासाहेब पाटील, कुमार पाटील, वसंत सूर्यवंशी, अशोक जाधव, सी.एस. कुलकर्णी, महानंदा शेटे. सूत्रसंचालन स्वाती सावळवाडे यांनी केले. आभार भारत निकम यांनी मानले.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वयाने नियोजन करणे आवश्यक : जिल्हाधिकारी किशन जावळे

रायगड (याकूब सय्यद) : रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद




मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्र.पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले, सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. तसेच या काळात उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी व तहसीलदार यांनी उत्तम समन्वय राखत काम करावे. नगरपालिका, महानगरपालिकांनी नालेसफाईची कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत. तसेच महाड शहरात दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते. अशा पूरपरिस्थितीत मदत कार्य व बचावासाठी आवश्यक पूर्वतयारी व उपाययोजना केली जावी.सर्व शासकीय यंत्रणांनी आपदा मित्रांची बैठक घेऊन नियोजन करावे. निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिर्के यांनी तालुकास्तरीय नियंत्रण कक्ष २४ ७ कार्यान्वित बाबत, तसेच विविध विभागांचे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा प्रशासनास पाठवण्याबाबत सांगितले. पुनर्वसन सुरू असलेल्या गावांतील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सांगितले. प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी केले. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यासह एन डी आर एफ, होमगार्ड ,महावितरण , सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे अधिकारी यासह विविध शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामस्वच्छता अभियान चोरांबे गावला महाराष्ट्र दिनी पुरस्कार

मेढा(अजित जगताप): लोकशाहीमध्ये ग्रामस्वच्छता अभियानातून चोरंबे (ता.जावळी) गावाने नावलौकिक प्राप्त केला आहे. एक मे रोजी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या गावाला पुरस्कार देण्यात येणार आहे.



पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई यांच्या हस्ते सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम होणार आहे. जावळी, कराड, कोरेगाव, खटाव तालुक्यातील विजेत्या गावांचे कौतुक होत आहे.

सन २०२३-२४ कालावधी करिता संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार रक्कम रुपये सहा लाख ग्रामपंचायत चोरांबे (ता. जावली), द्वितीय चार लाख ग्रामपंचायत सुपने (ता. कराड), तृतीय रुपये तीन लाख, अंभेरी (ता. खटाव) यांना मिळालेला आहे.

विषेश पुरस्कार पन्नास हजार स्व. वसंतराव नाईक पुरस्कार घनकचरा सांडपाणी व मैला गाळ व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत हजारमाची (ता. कराड), डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत बेलोशी (ता. जावळी), स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कार शौचालय व्यवस्थापनासाठी गोगावलेवाडी (ता. कोरेगाव) यांना मिळाला आहे.

दरम्यान, स्पर्धेमध्ये प्रथम विजेते ठरलेले जावळी तालुक्यातील चोरांबे हे गाव शिवसेनेचे माजी आमदार सदाशिव सपकाळ यांचे आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, पालकमंत्री शंभूराजे देसाई यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# भाजप सातारा जिल्हाध्यक्ष पदासाठी चार डझन इच्छुकांची परीक्षा

सातारा (अजित जगताप) : केंद्र व राज्यात भारतीय जनता पक्ष प्रणित सरकार असल्यामुळे निश्चितच सातारा भाजप जिल्हाध्यक्ष होण्यासाठी चांगलीच चढाओढ लागलेली आहे. सातारा शासकीय विश्रामगृहात चार डझन जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याने नेमकी कुणाची निवड करावी? असा वरिष्ठांना प्रश्न पडला आहे.



लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत भाजप नेते व प्रचारक आणि बूथ प्रमुखांनी केलेल्या प्रचारामुळे लाडक्या बहिणींनी पण विजयासाठी हातभार लावला. त्यामुळे भाजपचे कमळ सर्वत्र संचार करत आहे. काही महायुतीतील घटक पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

माजी आ. डॉ. दिलीप येळगावकर, दत्ताजी थोरात, विक्रम पावसकर, धैर्यशील कदम, रामकृष्ण वेताळ, सुनील काटकर, सुप्रियाताई शिंदे, सुवर्णाताई पाटील, शिवदास, मनीष महाडवाले, रवींद्र पवार, भरत पाटील, विजय काटवटे, सतीश भोसले, जयकुमार शिंदे, विकास गोसावी, सुनील काळेकर, अमोल कांबळे, प्रवीण शहाणे, मनोज शेंडे उपस्थित होते. यांच्यासह चार डझन जिल्हा अध्यक्ष इच्छुक यांना प्रश्नपत्रिका देऊन अपेक्षित उत्तर मिळवण्याची प्रयत्न सुरू झालेले आहेत. २ मे रोजी नूतन सातारा जिल्हा अध्यक्ष यांची घोषणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सातारा जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी पक्षीय पातळीवर प्रदेश सरचिटणीस व निवडणूक पर्यवेक्षक राजेश पांडे, सातारा जिल्हा निरीक्षक व कसबेचे आमदार हेमंत रासणे यांनी प्रत्येकाचे मत समजून घेतले. भारतीय जनता पक्षाच्या स्वबळाचा नारा दिल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कमळ फुलवण्यासाठी नेते इच्छुक झालेले आहेत.

# संतोष डांगे यांना आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार प्रदान



कराड : मलकापूर (ता. कराड) येथील श्री शिवांजली फाउंडेशनच्या वतीने वाघेरी येथील संतोष जनार्दन डांगे यांना आदर्श क्रीडाशिक्षक कराड भूषण पुरस्कार येथील वेणुताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहामध्ये प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ शिक्षण तज्ञ श्रीमती सरोज एन.डी.पाटील, साहित्यिक किसनराव कुराडे, डॉ. डी.पी.खाडे,महाराष्ट्र राज्य जीएसटी कमिशनर प्रदीप जगदाळे,मेजर प्रा.प्रशांत कदम यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य जीएसटी कमिशनर प्रदीप जगदाळेर,जेष्ठ पुरोगामी विचारवंत आर.एस.चोपडे, प्रविणकुमार जगताप, श्री शिवांजली फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. हणमंतराव कराळे पाटील उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला राज्यपालांचे वाणिज्य दूतांसाठी चहापान

मुंबई : १ मे रोजी साजरा होत असलेल्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचे औचित्य साधून राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध देशांच्या मुंबईतील वाणिज्यदूत व मानद वाणिज्य दूतांसाठी राजभवन येथे स्वागत समारोहाचे आयोजन करण्यात आले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर साधेपणे करण्यात आलेल्या या स्वागत समारोहाचे आयोजन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या पुढाकाराने राजशिष्टाचार विभागातर्फे करण्यात आले. यावेळी राज्यपालांसह उपस्थित ७० देशांच्या वाणिज्यदूतांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातील मृतांना एक मिनिट स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन



व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सर्व वाणिज्यदूतांची भेट घेतली व शुभेच्छा दिल्या. स्वागत समारोहाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, बंदरे व मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे प्रशासक भूषण गगराणी यांसह विविध विभागांचे ज्येष्ठ अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रगीत व राज्यगीत झाल्यानंतर राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांच्या वतीने उपस्थित वाणिज्यदूतांचे स्वागत केले.

# औंध येथील विद्यार्थ्यांचे अक्षरगंगा प्रज्ञाशोध परिक्षेत सुयश

औंध : श्री भवानी बाल विद्यामंदिर मधील विद्यार्थ्यांनी अक्षर गंगा प्रज्ञाशोध परिक्षेत सुयश संपादन केले. यामध्ये इयत्ता दुसरी तील अद्वैत अमोल यादव याने जिल्हा गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक मिळवला.

इयत्ता दुसरीतील ऋतुजा शंकर माळी हिने केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक तसेच आरोही सागर मोरे व सानिया सुरज शेख यांनी द्वितीय क्रमांक,सई वैभव देशपांडे हिने तृतीय क्रमांक मिळवला. इयत्ता पहिली मध्ये केंद्र स्तरावर अनुश्री सुजित शिंदे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. इयत्ता तिसरी मध्ये आरोही अमर देवकर यांनी केंद्र स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. इयत्ता चौथी मध्ये देवेंद्र अमोल गुरव यांनी केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक व अर्पिता अनिल कदम हिने द्वितीय क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे औंध शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, चेअरमन गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी,व्हा. चेअरमन चारुशीला राजे पंतप्रतिनिधी, विश्वस्त हणमंतराव शिंदे, अतुल क्षीरसागर, प्रशांत खैरमोडे, राजेंद्र माने, शाकीर आतार, सचिव प्रदीप कणसे,सहसचिव संजय निकम, दिपक कर्पे , मुख्याध्यापक अमोल यादव व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# वैष्णवीचा ७ वीच्या पुस्तकात धडा

शिराळा : विश्वासराव नाईक कला वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा येथील इयत्ता बारावीची विद्यार्थिनी पै. वैष्णवी धनाजी सावंत हिची उल्लेखनीय कामगिरी महाविद्यालयाचा अभिमान वाढवणारी ठरली आहे. वैष्णवीच्या जिद्दी आणि प्रेरणादायी प्रवासावर आधारित एक मुलाखत जिद्दी वैष्णवीची हा धडा इयत्ता सातवीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.



तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे सचिव मा. विश्वप्रतापसिंग नाईक, उपाध्यक्ष मा. पृथ्वीसिंग नाईक, महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र बनसोडे, उपप्राचार्य मा. राजसिंह पाटील, उपप्राचार्य मा. बी. आर. दशवंत, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. ए. एल. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. एस. जे. गायकवाड, तसेच प्रा. वाय. बी. मोहिते उपस्थित होते .

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा. पृथ्वीसिंग नाईक यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतात, वैष्णवीच्या वडिलांच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले आणि भविष्यातही वैष्णवीच्या पाठी संपूर्ण संस्थेचा विश्वास आणि पाठिंबा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र बनसोडे यांनी आपल्या मनोगतातून वैष्णवीच्या परिश्रमाचे आणि जिद्दीचे कौतुक केले.

# उपेक्षित कामगारांच्या स्वेदगंगेचा सन्मान झाला पाहिजे

## प्रा.डॉ.राजा दीक्षित, नारायण सुर्वे पुरस्काराने धर्मवीर पाटील यांचा सन्मान

पुणे : कामगार चळवळ अतिशय क्षीण झाली असून कंत्राटी आणि असंघटित कामगार आपला लढा कसा देणार हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे उपेक्षित कामगारांच्या स्वेदगंगेचा सन्मान झाला पाहिजे असे विचार महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केले.



आंतरराष्ट्रीय कामगारदिन आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनादिनानिमित्त नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी आयोजित तेहतिसाव्या श्रम - उद्योग परिषदेत विविध पुरस्कार प्रदान करीत असताना डॉ. दीक्षित बोलत होते. ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी परिषदेचे उद्घाटन केले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. सुनीताराजे पवार अध्यक्षस्थानी होत्या; तसेच नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, पुरुषोत्तम सदाफुले प्रमुख उपस्थित होते. इस्लामपूर येथीलकवी धर्मवीर पाटील यांच्या 'दिवस कातर होत जाताना' या पुस्तकासाठी त्यांना नारायण सुर्वे साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबईचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांना 'पद्मश्री नारायण सुर्वे जीवनसाधना सन्मान', नांदेड येथील श्रीनिवास मस्के (बाईचा दस्तऐवज), नांदगाव येथील प्रतिभा खैरनार (वंशावळीच्या प्राचीन सरीतून) यांना नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार सांगली येथील विनायक कुलकर्णी (ऋतुपर्ण) यांना केशवसुत साहित्य पुरस्कार देण्यात आला. 'मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान' कविवर्य माधव पवार यांच्या सहधर्मचारिणी चारुलता माधव पवार यांना प्रदान करण्यात आला. कष्टकरी महासंघ या संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ नखाते यांना 'नारायण मेघाजी लोखंडे स्मृती कष्टकरी हितसंवर्धन संघटना पुरस्कार'; माणिकराव ढोकले यांना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

**पुरुषोत्तम सदाफुले यांनी पुरस्कार निवडीबाबत भूमिका मांडली**

डॉ. सुनीताराजे पवार यांन 'जगातील सर्वोत्तम गोष्टी कामगारांच्या कष्टांतून निर्माण झालेल्या आहेत. अर्धे जग महिलांनी व्यापले असून विषमतेची दरी कमी करून त्यांचा मान राखला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. बाजीराव सातपुते यांनी 'एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे' या व्याख्यानातून नारायण मेघाजी लोखंडे आणि नारायण सुर्वे यांचा जीवनपट मांडला. प्रतिमा काळे लिखित 'अहिल्याबाई होळकर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. महेंद्र भारती, मानसी चिटणीस, प्रभाकर वाघोले, जयश्री श्रीखंडे, जयवंत भोसले, प्रा. प्रभाकर दाभाडे, एकनाथ उगले, प्रदीप गांधलीकर यांनी संयोजन केले.

# कुवेतमध्ये युगपुरुषांची संयुक्त जयंती साजरी

कराड - कुवेत मध्ये मराठी बांधव, फुले शाहू डॉ आंबेडकर विचारांचा वारसा जपणाऱ्या अनुयायांच्या वतीने संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. विश्वरत्न सम्राट अशोक, शाहू महाराज आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांना याप्रसंगी अभिवादन करण्यात आले. तसेच मानवतेचा संदेश देण्यात आला.

कुवेत शमधील मराठी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक बुद्ध वंदना ग्रहण करण्यात आली समाज सुधारकांच्या जीवनावर आधारित विशेष प्रस्तुती सादर करण्यात आली. लहान मुलांन आवडत्या नेत्यांची वेशभूषा परिधान करून त्यांच्याविषयी माहिती दिली.

कुवेत शहरातील चैतन्य व स्फूर्तीदायक वातावरणात जय शिवराय... जय भीम .... तसेच युगपुरुषांचा जयजयकार झाला.मुलांच्या या उत्साहवर्धक कार्यक्रमास उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. 'धम्मा' गटांमधील सदस्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि समाजाला ज्ञानसंपन्न करण्यासाठी एका ऑनलाइन ग्रंथालयाची सुरुवात झाली.

कुवेत सारख्या आखाती देशांमध्ये युगपुरुषांच्या जयंती महोत्सवानिमित्त कार्यक्रमाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांना उजाळा मिळाला आणि समाज प्रगतीसाठी नवीन दिशा मिळाली आहे.